# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ७९-२२** **दिनांक - ०८/०३/२०२२**

## अट्टल दुचाकी चोरास अटक करुन वाहन चोरीचे एकूण ०४ गुन्हे उघड करुन ०१,७५,०००/- रुपये किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात काशिमीरा पोलीस ठाण्यास यश.

काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत व मिरारोड परिसरातील दुचाकी वाहन चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपीताबाबत गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे सदर गुन्ह्यांच्या तपास करुन काशीमीरा पोलीस ठाणे कडिल गु.रजि.क्रमांक I १५८/२०२२ भादंवि कलम ३७९ या गुन्हयात आरोपीत नामे शादाब शाहीद शेख, रा. टाकीपाडा नाका, नालासोपारा ता. वसई जि. पालघर यास अटक केलेनंतर गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अमंलदार यांनी अटक आरोपीत याच्याकडे कौशल्याने तपास करुन अटक आरोपीत याने काशीमीरा पोलीस ठाणे हददीत व नयानगर पोलीस ठाणे हद्दीत यापुर्वी दुचाकी वाहन चोरीचे गुन्हे केले बाबतची कबुली दिल्याने काशिमिरा पोलीस ठाणे अभिलेखवावरील दाखल १) गु.रजि.क्रमांक १४७/२०२२ भा.द.वि कलम ३७९ २) गु.रजि.क्रमांक I १५६/२०२२ भा.द.वि.अन्वये कलम ३७९ तसेच ३) नयानगर पोलीस ठाणे येथे गु.रजि.क्र I १४९/२०२२ भा.द.वि. कलम ३७९ या गुन्ह्यांची उकल करुन नमुद गुन्हयात चोरीस गेलेले दुचाकी वाहने आरोपीताकडून हस्तगत करण्यात आली आहे.

नमुद गुन्हयात अटक आरोपीताकडून १) ५०,०००/- रु कि ची होंडा कंपनीची शाईन दुचाकी २) ३५,०००/- रु सफेद रंगाची होंडा कंपनीची ॲक्टिव्हा दुचाकी ३) ५०,०००/- रु सुझुकी कंपनीची एसेस १२५ सी.सी. दुचाकी ४) ४०,०००/- रु होंडा कंपनीची ॲक्टिव्हा दुचाकी असा एकुण ०१,७५,०००/- कि चा मुददेमाल हस्तगत करुन खालील नमुद ०४ दुचाकी वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

| अ.क्रं | पोलीस ठाणे | गुन्हा नोंदवही क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १ | काशिमीरा | काशीमीरा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १४७/२०२२ कलम ३७९ भा.द.वि. |
| २ | काशिमीरा | काशीमीरा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I १५६/२०२२ कलम ३७९ भा.द.वि. |
| ३ | काशिमिरा | काशीमीरा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I १५८/२०२२ कलम ३७९ भा.द.वि. |
| ४ | नयानगर | नयानगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I १४९/२०२२ कलम ३७९ भा.द.वि. |

नमुद गुन्हयातील अटक आरोपीत हा अभिलेखावरील आरोपीत असून त्याचेवर यापुर्वी १) बांद्रा पोलीस ठाणे गु.र.नं. I ७६०/२०१८ कलम ३९२, ३४ भा.द.वि., २) बांद्रा पोलीस ठाणे गु.र.नं. I ७६१/२०१८ कलम ३९२, ३४ भा.द.वि. ३) नयानगर पोलीस ठाणे गु.र.नं. I ७४/२०२१ कलम ३७९ भा.द.वि. ४) नवघर पोलीस ठाणे गु.रजि.क्रमांक I १७५/२०१९ कलम ३७९ भा.द.वि.अन्वये गुन्हे नोंद आहेत.

सदरची कामगिरी श्री. अमित काळे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-०१ श्री. विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली काशिमिरा पोलीस ठाण्याचे वपोनि. श्री संजय हजारे, पोनि. श्री विजय पवार, स.पो.निरी. महेंद्र भामरे, पो.ना. गणेश कोळी, पोशि. निलेश शिंदे, जयकुमार राठोड, सुधीर खोत, स्वप्निल मोहीले सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.